# अजितदादांच्या जाण्याने महाराष्ट्र पोरका

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २९८ ●गुरूवार, दि.२९ जानेवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■



# राजकारणातील 'दादा' पर्वाचा बारामतीत करुण अंत

## आज विद्या प्रतिष्ठानमध्ये दादांना अखेरचा निरोप, पीएम मोदी, अमित शाह उपस्थित राहणार



**बारामती । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि सर्वात धडाडीचे नेते आणि प्रत्येक दिवसाची सुरुवात पहाटे करून अवघ्या महाराष्ट्राला आदर्श घालून देणारे महाराष्ट्राचे 'दादा' व्यक्तिमत्व उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांचे (२८ जानेवारी) बारामतीमध्ये विमान अपघातात निधन झाले. अजित पवार ६६ वर्षांचे होते. अजित पवार यांच्यासह पाच जणांचा या अपघातात मृत्यू झाला. अजित पवार मुंबईहून बारामतीला एका खासगी विमानाने प्रवास करत होते. हे विमान VT-SSK नोंदणी क्रमांक असलेले बॉम्बार्डियर लिअरजेट ४५ मॉडेलचे होते. अजित पवार यांच्यासह त्यांचे अंगरक्षक विदीप जाधव, फ्लाईट असिस्टंट पिंकी माळी, कॅप्टन सुमित कपूर आणिकॅप्टन शांभवी पाठक अपघातात मृत्यूमुखी पडले. प्रशासनावर पकड असलेला धुरंदर नेता, आपल्याला जे पटलं नाही ते बेधडकपणे ▶ उर्वरित पान २ वर

## ● शरद पवारांसह पवार कुटुंबीय बारामतीत



अपघाताचे वृत्त समजताच पवार कुटुंबीयांसह अवघ्या राज्याला मानसिक धक्का बसला. अर्थसंकल्पीय अधिवेशनामुळे पत्नी खासदार सुनेत्रा पवार, बहीण सुप्रिया सुळे या दिल्लीमध्ये होत्या. त्यांचे विमानाने बारामतीमध्ये आगमन झालं. दुसरीकडे काका शरद पवार मुंबईमध्ये होते. वैद्यकीय तपासणी करून आल्यानंतर कुटुंबीयांनी अजित पवार यांच्या निधनाची माहिती देण्यात आली. त्यानंतर एक एक करून हे सर्व पवार कुटुंबीय बारामती वैद्यकीय महाविद्यालयामध्ये पोहोचले. बारामतीमध्ये वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अजित पवार यांचे पार्थिव ठेवण्यात आलं होतं. याठिकाणी अजित पवारांच्या पार्थिवाच्या दर्शनासाठी लाखोंचा जमाव पोहोचला. दुपारी तीनच्या सुमारास अजित पवारांचे पार्थिव विद्या प्रतिष्ठानमध्ये आणण्यात आले.

## ● तीन दिवसांचा दुखवटा, आज अंत्यसंस्कार; देवेंद्र फडणवीस गहिवरले



अजित पवार महाराष्ट्राचे लोकनेते होते. महाराष्ट्रातल्या प्रश्नांची जाण असलेला हा नेता होता. त्यांच्याबद्दल जनसामान्यांमध्ये प्रचंड आस्था होती. अतिशय संघर्षशील असं नेतृत्व होते. सर्व परिस्थितीत न डगमगता पुढे जाणारे व्यक्तिमत्व होते. महाराष्ट्रासाठी आजचा दिवस अत्यंत कठीण दिवस आहे अशी शोक भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. अजित पवारांच्या निधनावर देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अजित पवारांसारखे नेतृत्व तयार व्हायला अनेक वर्ष लागतात. ज्यावेळी महाराष्ट्राच्या विकासात ते महत्त्वपूर्ण योगदान देत होते, त्या काळात त्यांचे निघून जाणे हे अविश्वसनीय आणि मनाला चटका लावणारे आहे. माझ्यासाठी दमदार, दिलदार मित्र सोडून गेला आहे. त्यांच्या कुटुंबावर हा प्रचंड मोठा आघात आहे. मी, एकनाथ शिंदे लवकरच बारामतीकडे निघणार आहे. पंतप्रधान, गृहमंत्री यांना फोनवर घटनेची माहिती दिली आहे. त्यांनाही हा धक्का होता. त्यांनी प्रचंड दु:ख व्यक्त केले. पुढच्या सर्व गोष्टी कुटुंबाची चर्चा करून ठरवण्यात येतील असं फडणवीसांनी सांगितले.

## ● प्रत्यक्षदर्शीने सांगितले, शरीराचे अवयव ब्लँकेटने झाकले

प्रत्यक्षदर्शी महिलेने सांगितले की, विमानाचा स्फोट इतका जोरदार होता की कोणीही काहीही करू शकले नाही. बचाव पथक आले आणि आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी सुद्धा आम्हाला पाणी आणण्यास सांगितले. आम्ही बादल्यांमध्ये पाणी आणले. अजित पवार यांचे शरीर एका बाजूला पडले होते. आम्ही ते आमच्या स्वत:च्या डोळ्यांनी पाहिले. आम्ही ब्लँकेट दिले आणि त्यांचे शरीर त्यात गुंडाळले. अर्धा तास आग सुरु होती. चष्मा आणि घड्याळावरून आम्हाला ते अजित दादा असल्याचे ओळखता आले.

## ● 'दादा अशी exit घ्यायची नव्हती!', अजित पवारांच्या निधनानंतर पंकजा मुंडेंची भावुक प्रतिक्रिया



भाजपच्या नेत्या आणि मंत्री पंकजा मुंडे यांनी पोस्ट करत लिहिले की, 'दादा अशी exit घ्यायची नव्हती!! ... तुम्ही जीवाला चटका लावून गेलात... तुम्ही सदैव स्मरणात रहाल.. तुमच्यासोबत प्रवास केला, चर्चा केल्या, अगदी गप्पाही खूप मारल्या.. तुमचा political आणि academic sense खूप जबरदस्त होता.. तुमच्या भाषणातून, विनोद बुद्धीने तुम्ही अनेकांना स्पष्ट बोलूनही हसवलं पण आज तुमच्या जाण्याने तुम्ही कार्यकर्त्यांना रडवलं.. असा अनुभवी नेता होणे नाही .. महाराष्ट्र एका वूपराळल नेत्याला मुकला.. गोपीनाथ मुंडे परिवारातर्फे भावपूर्ण आदरांजली...'

## ● नि:शब्द! अजित पवारांच्या निधनानंतर पत्नी सुनेत्रा पवार यांच्यापुढे डोंगराएवढं दु:ख




'संकल्प, निष्ठा, कर्म– हाच माझा धर्म!', अशी स्वत:ची ओळख सांगणारे आणि शिव–शाहू–फुले–आंबेडकरांच्या स्मृतीला अभिवादन करून आपल्या प्रत्येक संबोधनपर भाषणाची सुरुवात करणारे, कार्यकर्त्यांना हक्कानं कामाला लावणारे आणि तितक्याच हक्कानं त्यांच्या कामाचं कौतुक करणारे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बुधवार, २८ जानेवारी २०२६ रोजी विमान अपघातात मृत्यू झाला. अजित पवारांच्या निधनाचं वृत्त समोर येताच संपूर्ण राज्य हादरलं. अर्थसंकल्पीय अधिवेशनासाठी दिल्लीमध्ये असणाऱ्या त्यांच्या पत्नी खासदार सुनेत्रा पवार, बहीण– खासदार सुप्रिया सुळे यांच्यापर्यंत विमान दुर्घटना आणि त्यानंतर झालेल्या या अप्रिय घटनेची माहिती पोहोचली आणि नेमकं काय आणि कसं व्यक्त व्हावं हेच या कुटुंबीयांना कळेना. इथं विमान दुर्घटनास्थळावरून अजित पवार यांचं पार्थिव प्रथम रुग्णालयात नेण्यात आलं आणि तिथं त्यांच्या पत्नी, सुनेत्रा पवार कोलमडलेल्याच अवस्थेत बारामतीत दाखल झाल्या. यावेळी त्यांचे सुपुत्र पार्थ पवार आणि सुप्रिया सुळे त्यांच्यासोबत होते.

## ● मुख्यमंत्रिपदाचं स्वप्न अपूर्ण....

मतदारसंघातला असो किंवा मतदारसंघाच्या बाहेरचा, ज्याचा मुद्दा पटला त्याचं काम करून देणारा नेता म्हणजे अजितदादा. अनेकांच्या स्वप्नांना प्रत्यक्षात उतरवणारे अजितदादा... मात्र अजित पवारांची स्वत:ची काही स्वप्नं अपूर्णच राहिली. त्यापैकी पहिलं स्वप्न म्हणजे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाचं.जे पोटात तेच ओठावर.... हा अजित पवारांचा स्वभाव. त्यामुळे अजित दादाच्या मनातली स्वप्नं महाराष्ट्रापासून कधी लपून राहिली नाहीत. महाराष्ट्राचं मुख्यमंत्री बनणं हे त्या यादीतलं सर्वात पहिलं स्वप्न. मात्र मुख्यमंत्रिपदानं वारंवार हुलकावणी दिल्यानं अजितदादा विरोधकांच्या खिल्लीचा विषयही बनले. पण अजितदादांनी त्याला ना थारा दिला, ना त्याचं मनाला लावून घेतलं. सन २००४ साली जेव्हा मुख्यमंत्रिपदाची संधी आली, तेव्हा मात्र, शरद पवारांनी मुख्यमंत्रिपदाचा मान काँग्रेसला दिला. पण, दुसरीकडे दादांनी उपमुख्यमंत्रिपदाचा विक्रम मात्र मोडून काढला. राज्याचे मुख्यमंत्री बदलत राहिले, पण उपमुख्यमंत्री अजित पवार कायम राहिले.



## महाराष्ट्राचा वाघ हरपला एक न संपणारी पोकळी



भल्या पहाटे कामाला लागणारा, निर्णयात ठाम आणि प्रशासनावर लोखंडी पकड असलेला नेता अचानक काळाच्या पडद्याआड गेला आणि महाराष्ट्राच्या राजकारणात एक न भरून येणारी पोकळी निर्माण झाली.

उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार म्हणजे फक्त एक पद नव्हतं, तर तो एक स्वभाव होता – थेट बोलणारा, स्पष्ट निर्णय घेणारा आणि कामाच्या बाबतीत कुणाचीही भीड न बाळगणारा. अधिकाऱ्यांवर धाक आणि जनतेत विश्वास निर्माण करणारी त्यांची कार्यशैली होती. राजकीय मतभेद असले तरी त्यांच्या क्षमतेबद्दल विरोधकांनाही मनापासून आदर वाटायचा.

जिल्हा बँकेपासून सुरू झालेला त्यांचा राजकीय प्रवास महाराष्ट्राच्या सत्ताकेंद्रापर्यंत पोहोचला. घरात शरद पवार साहेबांसारखा विशाल वटवृक्ष असतानाही, अजितदादांनी आपल्या कष्टाच्या जोरावर स्वतंत्र राजकीय व सामाजिक ओळख निर्माण केली. मोठ्या झाडाच्या सावलीत रोपटं वाढत नाही हा समज त्यांनी आपल्या कामगिरीतून खोटा ठरवला.

आज पुन्हा एकदा २०१४ ची वेदनादायी आठवण ताजी झाली

लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांनंतर जनतेशी थेट नाळ जोडलेला, जमिनीवरचा, विकासाचा ध्यास घेतलेला नेता अपघाताने हिरावून नेला गेला. हा केवळ एका नेत्याचा मृत्यू नाही, तर महाराष्ट्राच्या राजकीय धडाडीचा अपघात आहे.

परळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे यांनी व्यक्त केलेल्या भावना प्रत्येकाचं मन पिळवटून टाकणाऱ्या आहेत –

आज पुन्हा पोरका झालो माझे दादा मला पोरका करून गेले.

वडील गेल्यानंतर ज्यांनी वडिलांची उणीव कधीच भासू दिली नाही, ते दादा अचानक निघून जाणं मनाला मान्य होत नाही. आत्ता दादांचा फोन येईल आणि म्हणतील, धनंजय वेळेवर ये बरका अशी भावना आज प्रत्येक कार्यकर्त्याच्या मनात आहे.

संपूर्ण महाराष्ट्राच्या विकासाचे स्वप्न उराशी घेऊन झोपणारा आणि भल्या पहाटे ती स्वप्नं पूर्ण करण्यासाठी कामाला लागणारा नेता आज आपल्यातून निघून गेला. त्यांच्या अकाली जाण्याने देशाची, राज्याची, पक्षाची, बीड जिल्ह्याची आणि असंख्य कार्यकर्त्यांची कधीही न भरून निघणारी हानी झाली आहे.

अजितदादा गेले.... पण त्यांच्या निर्णयांची ठाम छाप, त्यांच्या आवाजातील आत्मविश्वास आणि त्यांच्या कामाची अफाट उरक –

हे सर्व महाराष्ट्राच्या स्मृतीत कायम जिवंत राहील.
महाराष्ट्राच्या राजकारणातील हा कोहिनूर हरपला आहे
आणि ही हानी कधीच भरून न निघणारी आहे.
श्रद्धांजली...
भल्या पहाटे निघून गेलास,
कामाच्या ओझ्याने झुकलेला नेता
आकाशात उड्डाण घेताना,
मातीशी नातं तुटलं कसं, दादा?
धाडस तुझ्या निर्णयात,
धाक तुझ्या शब्दात होता,
प्रशासन हादरायचं,
पण जनतेला आधार तुझ्यात दिसत होता.
वटवृक्षाच्या सावलीतही,
तू स्वतःचा सूर्य झालास,
आज तो सूर्य अस्ताला गेला,
महाराष्ट्र अंधारात राहिला
दादा, तुझी कामगिरी अमर आहे,
तुझं जाणं मान्य नाही मनाला,
एक वाघ हरपला महाराष्ट्राचा,
अश्रूंनी आज इतिहास लिहिला

**– श्री शिवकुमार केदारी, हिंद नगर, परळी वैजनाथ**

# अजित पवार यांचा विमान अपघातात मृत्यू, अपघातानंतर ५ महत्वाचे प्रश्न

पुणे जिल्ह्यातील बारामती विमानतळाजवळ झालेल्या विमान अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह इतर चार जणांचा मृत्यू झाला आहे. अजित पवार यांच्या निधनाने महाराष्ट्रातील भाजपा नेतृत्वाखालील आघाडी सरकारमध्ये मोठी पोकळी निर्माण झाली आहे. अजित पवार यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्रातून हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या अपघातानंतर पाच महत्वाचे प्रश्न उपस्थित होत आहेत.

केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री के. राम मोहन नायडू यांनी दिलेल्या माहितीनुसार, विमान अपघाताच्या वेळी दृश्यमानता कमी होती. बारामती हवाई वाहतूक नियंत्रण (एटीसी) ने पायलटला धावपट्टी दिसत आहे का असे विचारले तेव्हा उत्तर नाही असे आले. त्यानंतर विमान हवेत फिरले. दुसऱ्या लँडिंग प्रयत्नादरम्यान, एटीसीने पुन्हा विचारले की धावपट्टी दिसत आहे का, ज्यावर पायलटने हो असे उत्तर दिले. नागरी उड्डाण मंत्र्यांनी सांगितले की विमानाला लँडिंगसाठी परवानगी देण्यात आली होती. मात्र, काही क्षणांनंतर अपघाताची माहिती देण्यात आली.

१) अंतिम लँडिंगची परवानगी दिल्यानंतर नेमके काय घडले?

विमानाला सकाळी ८ वाजून ४३ मिनीटांनी लँडिंगची परवानगी मिळाली होती. परंतु एटीसीला पायलटकडून कोणतीही माहिती किंवा पुष्टी मिळाली नाही. सकाळी ८ वाजून ४४ मिनीटांनी ज्वाला दिसल्या आणि डीजीसीएच्या मते, विमान सकाळी ८.४५ वाजता क्रॅश-लँडिंग झाले.




यामुळे प्रश्न उपस्थित होतो की, लँडिंग परवानगी दिल्यानंतर शेवटच्या क्षणी सिस्टम अचानक बिघाड झाला का? नियंत्रण सुटले का? किंवा कॉकपिटमध्ये आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली का?

२) जर दृश्यमानता कमी असेल तर लँडिंगचा प्रयत्न का केला?

नागरी विमान वाहतूक मंत्र्यांनी सांगितले की, प्राथमिक माहितीवरून असे दिसून येते की लँडिंगच्या वेळी दृश्यमानता कमी होती. सुरुवातीला क्रूने धावपट्टी दिसत नसल्याचे सांगितले, नंतर फेरफटका मारल्यानंतर ती परत केली. बारामती हे एक अनियंत्रित विमानतळ आहे (सक्रिय हवाई वाहतूक नियंत्रण टॉवर नसलेले), जिथे वाहतूक माहिती फ्लाइंग स्कूलमधील प्रशिक्षक किंवा वैमानिकांकडून शेअर केली जाते. सुरक्षित लँडिंग प्रयत्नासाठी हवामान आणि विमानतळाची परिस्थिती योग्य होती का, की पहिल्या अयशस्वी प्रयत्नानंतर विमान वळवले गेले असावे?

३) अचानक रेडिओ संपर्क तुटण्याचे कारण काय? लँडिंग परवानगी मिळेपर्यंत क्रू सतत संपर्कात राहिले, त्यांनी हवाई/दृश्यमानता माहिती मागितली आणि धावपट्टीची स्थिती दिली. अंतिम परवानगी दिल्यानंतर रेडिओ संपर्क तुटला. ही ओव्हरलोडमुळे आणीबाणीची परिस्थिती होती की अचानक ऑपरेशनल बिघाड झाला होता?

४) गो-अराउंड किंवा अंतिम दृष्टिकोनादरम्यान विमानात बिघाड झाला का?

धावपट्टीवर विमानाला आग लागली. अधिकृत निवेदनांमधील नियामक नोंदी दर्शवितात की विमानाकडे वैध उड्डाण प्रमाणपत्रे होती आणि अलीकडेच त्याचा हवाई योग्यतेचा आढावा घेण्यात आला होता. विमानाला इंजिनमध्ये बिघाड, पक्षी धडकला, इंधन गळती, विद्युत आग किंवा हार्ड लँडिंगचा त्रास झाला का?

५) मानक प्रक्रियांचे पालन केले गेले का?

हवामानाच्या परिस्थितीनुसार वैमानिकाला लँडिंग करण्याचा सल्ला देण्यात आला. सुरुवातीला क्रूला धावपट्टी दिसली नाही, नंतर मंजुरी मिळण्यापूर्वीच धावपट्टी दिसल्याचे कळवले. मानक कार्यप्रणाली (SOP) नुसार लँडिंग स्थिर झाले होते का, की विमान खूप उंचीवर पोहोचले होते, खूप वेगाने पोहोचले होते किंवा सुरक्षित लँडिंग पूर्ण करण्यासाठी खूप उशिरा पोहोचले होते?

अपघातानंतर पुढे काय?

विमानातून मिळालेल्या ब्लॅक बॉक्सचे (फ्लाइट डेटा रेकॉर्डर आणि कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर असलेले) विश्लेषण करून अपघाताचे कारण निश्चित केले जाईल. अजित पवार हे सकाळी ५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीसाठी पुणे जिल्ह्यात चार रॅलींना संबोधित करण्यासाठी मुंबईहून निघाले होते. यावेळी बारामती विमानतळावर जवळ अपघात झाला. १५००० तासांचा उड्डाणाचा अनुभव असलेले कॅप्टन सुमित कपूर हे अपघातात मृत्युमुखी पडले आहेत. सह-वैमानिक कॅप्टन शांभवी पाठक, ज्यांना १५०० तासांचा उड्डाणाचा अनुभव होता, वैयक्तिक सुरक्षा अधिकारी (PSO) विधीप जाधव आणि फ्लाइट अटेंडंट पिंकी माली यांचाही अपघातात मृत्यू झाला आहे.

## गोपीनाथ मुंडे, विनायक मेटे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार...

# महाराष्ट्राच्या तीन लोकनेत्यांची अपघातामुळं अकाली एक्झिट, राज्यावर दुःखाचा डोंगर



गोपीनाथ मुंडे यांचं दिल्लीत अपघाती निधन

केंद्रात २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींचं सरकार आल्यानंतर गोपीनाथ मुंडे यांना केंद्रीय मंत्रिमंडळात संधी मिळाली होती. मंत्रिपद मिळाल्यानंतर गोपीनाथ मुंडे बीडला येण्यासाठी निघाले होते. गोपनीथ मुंडे यांच्या वाहनाला भरधाव कारनं धडक दिली आणि यातचं त्यांचं निधन झालं. महाराष्ट्राला हा धक्का ३ जून २०१४ रोजी बसला होता. गोपीनाथ मुंडे यांच्या निधनानं बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रावर दु : खाचा डोंगर कोसळला होता.

विनायक मेटे यांचा मुंबईला जाताना मृत्यू

विनायक मेटे यांनी शिवसंग्राम संघटनेच्या माध्यमातून मराठा आरक्षणासाठी राज्यभर आक्रमकपणे काम केलं. मराठा समाजाला आरक्षण मिळावं म्हणून विनायक मेटे शेवटपर्यंत प्रयत्न करत राहिले. मराठा आरक्षणासंदर्भातील बैठकीसाठी मुंबईला जात असताना विनायक मेटे यांच्या कारचा पुणे- मुंबई एक्सप्रेस वेवर अपघात झाला. विनायक मेटे यांच्या कारचा अपघात १४ ऑगस्ट २०२२ ला झाला. या अपघातात विनायक मेटे यांचं निधन झालं. विनायक मेटे यांनी महाराष्ट्राच्या विधानपरिषदेचे सदस्य म्हणून देखील काम केलं.

अजित पवार यांचा विमान अपघातात मृत्यू

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्रिपद अजित पवार यांनी सहा वेळा भूषवलं. महाराष्ट्राचे वित्त मंत्री म्हणून देखील त्यांनी काम पाहिले. राज्याची आर्थिक शिस्त कायम राहावी यासाठी ते आग्रही असायचे. अजित पवार यांनी निवडणुकीच्या राजकारणात लोकसभेचे खासदार म्हणून प्रवेश केला. खासदारपद भूषवल्यानंतर अजित पवार महाराष्ट्राच्या राजकारणात सक्रिय झाले. अजित पवार मुंबईतील कामं आटोपून आज जिल्हा परिषद निवडणुकीच्या निमित्तानं बारामतीला निघाले होते. बारामती तालुक्यात आज त्यांच्या सभांचं आयोजन करण्यात आलेलं होतं. मात्र, बारामती विमानतळावरील दृश्यमानता कमी असल्यानं विमान लँडिंग करण्याचा पहिला प्रयत्न फसला होता. त्यानंतर पायलटनं मोठा वळसा घालून पुन्हा लँडिंगचा प्रयत्न केला. मात्र, दुसरा प्रयत्न देखील अपयशी ठरला. पायलट दुसऱ्या प्रयत्नात अजित पवार यांचं विमान रनवेवर उतरु शकलं नाही. सकाळी ८ वाजून ४६ मिनिटांनी विमानाचा स्फोट झाला. यात अजित पवार यांचं निधन झालं.

◆ पान १/४ वरून पुढे...

### आज विधा....

बोलणारे दादा, कार्यकर्त्यांना जागेवर सुनावणारे दादा, राजकीय विरोधकांनाही त्याच भाषेत सुनावणारे दादा अशा एक नव्हे तर अनेक आठवणी महाराष्ट्राच्या राजकारणात दादांच्या व्यक्तिमत्वाने कोरल्या गेल्या आहेत. अजित पवार जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी जाहीर सभेला संबोधित करण्यासाठी बारामतीला जात होते. त्यांच्या आज चार ते पाच सभा होणार होत्या. ते सकाळी ८:१० वाजता मुंबईहून निघाले. महाराष्ट्र विमान वाहतूक विभागाच्या म्हणण्यानुसार, वैमानिकाने बारामती विमानतळावर उतरण्याचा प्रयत्न केला, परंतु धावपट्टी स्पष्ट दिसत नसल्याने पायलटने विमान अधिक उंचीवर नेले. पहिला प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर, बारामतीच्या धावपट्टी ११ वर उतरण्याचा आणखी एक प्रयत्न करण्यात आला. या दरम्यान, विमान धावपट्टीवरून घसरले आणि अपघात झाला आणि त्यात आग लागली. आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार, वैमानिकाने लँडिंग दरम्यान कोणताही आपत्कालीन सिग्नल दिला नाही. त्याने 'मेडे' कॉलही केला नाही.

### दादांच्या जाण्याने...

प्रतिक्रियेमुळे सर्वांचेच डोळे पाणावले. राजकीय वर्तुळात अजित पवार आणि धनंजय मुंडे यांचे नाते मार्गदर्शक आणि शिष्य याच्या पलीकडचे होते. राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत फळीत अजितदादांचा सर्वात लाडका कोण? असा प्रश्न अनेकदा चर्चेत असायचा. त्यावेळी अजित पवारांनी अनेकदा व्यासपीठांवरून धनंजय मुंडे असे नाव जाहीरपणे घेतले होते. मुंडेंच्या राजकीय संघर्षात दादा नेहमीच ढाल बनून उभे राहिले. तसेच अजित दादांच्या प्रत्येक निर्णयावर धनंजय मुंडेंनी विश्वास टाकला. केवळ स्वकीयच नाही, तर विरोधकही अजितदादांच्या जाण्याने हळहळले आहेत. माकपचे माजी आमदार नरसय्या आडम यांनी सोलापूरमध्ये बोलताना सांगितले की, दादा हे केवळ सत्तेतील नेते नव्हते, तर ते कष्टकऱ्यांचे कैवारी होते. वैचारिक मतभेद असूनही त्यांनी बीडी कामगार, बेघर आणि झोपडपट्टीवासीयांच्या प्रश्नांवर नेहमीच सकारात्मक निर्णय घेतले. तसेच लोकांमध्ये राहून काम करणारा असा धडाडीचा नेता अचानक निघून जाणे हा महाराष्ट्राच्या राजकारणातील मोठा धक्का आहे, असे यशोमती ठाकूर म्हणाल्या. अजित पवार यांच्या अकाली जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणातील एक कार्यकर्ता आणि धडाडीचा प्रशासक हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. बारामतीकडे राज्याच्या कानाकोपऱ्यातून समर्थक आणि नेते धाव घेत आहेत.

◆ पान १/४ वरून पुढे...

### दादांच्या अकस्मिक...

अजितदादांसारखा कणखर नेता महाराष्ट्राने गमावणे हे अत्यंत दुर्दैवी आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण होणारी पोकळी कधीच भरून निघणार नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासह संपुर्ण महाराष्ट्राची त्यांच्या अकाली जाण्याने मोठी हानी झाली आहे. सहकार, सिंचन, शेती, शिक्षण या क्षेत्रात त्यांचा अभ्यास होता. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून जिल्ह्यातील जनता त्यांच्याकडे आश्वासक विकासाची आस लावून बसले होते. पालकमंत्री पदाच्या अतिशय अल्प काळात त्यांनी जिल्ह्यात अनेक मोठे प्रकल्प मंजुर करून जिल्हा वासियांना विकासाची चुणूक दाखवली होती. बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेबरोबर त्यांनी या कालावधीत अतुट नाते निर्माण केले होते. जाती-पातीच्या पलिकडे जावून त्यांनी शिव, शाहू, फुले, आंबेडकरांचा विचार सतत जोपासण्याचे काम केले. पंडित कुटूंबियांशी त्यांनी राजकारणा पलिकडे स्नेह जोपासला होता. त्यांच्या अशा अकस्मिक जाण्याने खऱ्या अर्थाने आम्ही पोरके झालो आहोत. भावपूर्ण श्रध्दांजली...

### अजित पवारांच्या...

राजकातील दिग्गजांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. प्रचंड लोकप्रियता मिळवलेल्या नेत्यांमध्ये स्व.गोपीनाथराव मुंडे, मराठा आरक्षणाचे खंदे समर्थक स्व.विनायकराव मेटे यांचाही अपघातील मृत्यू झाला. हे गुढ नेमके उकललेले नसतांना बारामतीत पुन्हा असा मोठा अपघात होवून राज्यातील मोठा नेता अशा प्रकारे आपल्यातुन निघुन जातो. ही बाब नक्कीच विचार करायला लावणारी आहे.आणि त्यासोबतच महाराष्ट्र सह बीड जिल्ह्याचे मोठे नुकसान झाले आहे अजित दादा पालकमंत्री झाल्यानंतर बीड जिल्ह्यातील नागरिकांची खूप मोठी अपेक्षा दादांकडून होती ती अपेक्षा पूर्ण करणारा असा मोठा दिलदार व प्रशासनावर वचक असणारा नेता राहिला नाही ही खंत आता बीड जिल्ह्यात वासियांना राहणार आहे.

◆ पान १/४ वरून पुढे...

### महाराष्ट्राने कणखर...

बीडच्या विकासाची आशा आज अजित दादाच्या अचानक जाण्यामुळे मावळलेली आहे महाराष्ट्र भूमीने आपला कणखर पुत्र आज गमावला आहे अशा भावना शेतकरी हक्क मोर्च्याचे राजेंद्र आमटे यांनी व्यक्त केला

### 'अश्रूंनी ओलावलेली...

पटलावर अनेक चढ-उतार आले, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठे फेरबदल झाले, तरीही या बहीण-भावाच्या नात्यात कधीही अंतर पडले नाही. विमलताईंच्या निधनानंतर मुंदडा कुटुंब आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात राजकीय दुरावा निर्माण झाला असला, तरी अजित पवारांनी हे कौटुंबिक संबंध कधीही तुटू दिले नाहीत. त्यांनी मुंदडा कुटुंबाला नेहमीच हक्काचा आधार दिला. युवा नेते अक्षय मुंदडा यांना त्यांनी नेहमीच भाच्याप्रमाणे वागणूक दिली आणि त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले.

मुंदडा कुटुंबात सून म्हणून आलेल्या नमिता मुंदडा यांच्यासाठी अजित पवार हे केवळ एक ज्येष्ठ नेते नव्हते, तर ते एक उत्तम मार्गदर्शक होते. केज विधानसभा मतदारसंघाच्या विकासकामात त्यांनी नेहमीच सक्रिय सहकार्य केले. नमिता मुंदडा यांना ते कुटुंबातील मुलीप्रमाणेच सजतत. प्रशासकीय कामकाज कसे करावे, फाईल्सचा पाठपुरावा कसा करावा आणि जनतेचे प्रश्न ताकदीने कसे मांडावेत, याबाबत वेळोवेळी मार्गदर्शन केले. आज या मार्गदर्शकाचे छत्र हरपल्याची भावना नमिता मुंदडा यांची आहे. आहे. कर्तव्याशी निष्ठा, शब्दाला वजन आणि निर्णयात ठामपणा असलेलं नेतृत्व आज आपल्यातून निघून गेलं आहे. दादा, तुमची अनुपस्थिती प्रत्येक टप्प्यावर जाणवेल. ही हानी अपूरणीय असून तिची भरपाई कधीच होऊ शकणार नाही. सामान्य माणसाच्या प्रश्नांसाठी सदैव उभं राहिलेलं नेतृत्व म्हणून तुमचं कार्य कायम स्मरणात राहील. आपल्या आयुष्यभराच्या सेवेला विनम्र नमन अशा शब्दांत त्यांनी आपला शोक व्यक्त केला.

◆ पान १/४ वरून पुढे...

### राज्यातील तरुणांचा...

त्यांच्या कामाची पद्धत संपूर्ण महाराष्ट्राने अनुभवले आहे. कुशल प्रशासक, शिस्तप्रिय नेता म्हणून त्यांची राज्यात ओळख होती. राज्याचे एक उमदे नेतृत्व आपल्यापासून कायम दुरावले आहे. पक्षाबरोबरच राज्याचेही मोठे नुकसान झाले आहे. देशातील तरुण फळीतील एक उमदा नेता आपण गमावला आहे. राज्यातील तरुणांमध्ये अजित दादा पवार यांचे विषयी एक प्रकारची आत्मीयता निर्माण झाली होती. अजित दादा म्हणजे १००% वादा अशी छाप राज्यात त्यांनी निर्माण केली होती. पवार कुटुंबीय आणि पक्षातील कार्यकर्ते, राज्यातील कार्यकर्ते यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. यातून सावरण्याची शक्ती ईश्वराने द्यावी अशी भावना समता परिषदेचे राज्य सरचिटणीस तथा बीड जिल्हाध्यक्ष ड. सुभाष राऊत यांनी व्यक्त केली आहे.

### देशातील तरुण...

एक उमदा नेता आपण गमावला आहे. पवार कुटुंबीय आणि पक्षातील कार्यकर्ते राज्यातील कार्यकर्ते यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. यातून सावरण्याची शक्ती ईश्वराने द्यावी अशी भावना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी आपल्या शोकसंदेशात व्यक्त केली आहे.

### पगार नव्हे,...

मान्य होतं. या निर्णयाची अंमलबजावणी होण्याआधीच काळाने त्यांना आमच्यातून हिरावून नेलं. सामान्य माणसाच्या पोटाचा विचार करणारा, पदापेक्षा माणूस मोठा मानणारा असा नेता पुन्हा होणं कठीण आहे.
भावपूर्ण श्रद्धांजली दादा.
तुमचे उपकार आमची पिढी कधीच विसरणार नाही.
हज़ारों साल नर्गिस अपनी बे-नूरी पे रोती है,
बड़ी मुश्किल से होता है चमन में दीदा-वर पैदा।
(हजारो वर्षे निसर्ग वाट पाहतो, तेव्हा कुठे एखादा असा कर्तृत्ववान माणूस जन्माला येतो.)

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# जि. प. शाळा वाचवण्यासाठी विषप्राशनाची वेळ शिक्षणप्रेमी अमोल जाधवांवर येणे हि शासन-प्रशासनासाठी लाजिरवाणी बाब



## खाजगी संस्थानिकांशी संधान बांधून सरकारी शाळा बंद पाडण्याचे षडयंत्र : डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

नांदुरघाट ता. केज जि. बीड येथील जिल्हा परिषद शाळेसाठी वर्गखोल्या मंजूर न झाल्याने तसेच शाळा बांधकामातील कथित गैरव्यवहारावर कारवाई व्हावी या मागण्यांसाठी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल जाधव यांना प्रजासत्ताकदिनी विषप्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न करावा लागणे, ही घटना शासन व प्रशासनाच्या असंवेदनशीलतेचे जिवंत उदाहरण असून अत्यंत लाजिरवाणी आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली आहे. नांदुरघाट येथील जिल्हा परिषद शाळा वाचवण्यासाठी, ग्रामीण भागातील गोरगरिबांच्या मुलांना मूलभूत शैक्षणिक सुविधा मिळाव्यात तसेच शाळा बांधकामातील गैरव्यवहार प्रकरणाची चौकशी होऊन दोषींवर कारवाई व्हावी यासाठी अमोल जाधव गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने शासन व प्रशासन स्तरावर पाठपुरावा, आंदोलने तसेच न्यायालयीन प्रयत्न करत होते. मात्र, वारंवार निवेदने देऊनही शाळेसाठी आवश्यक वर्गखोल्या मंजूर न झाल्याने आणि प्रशासनाकडून न्याय न मिळाल्याने अखेर दि. २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताकदिनी त्यांनी विषप्राशन करून टोकाचे पाऊल उचलले. जिल्हा प्रशासनातील काही अधिकारी खाजगी शिक्षणसंस्थाचालकांशी संगनमत करून जिल्हा परिषद शाळा डबघाईस आणण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप करत, जिल्हा परिषद शाळा जगविण्यासाठी झटणाऱ्या शिक्षणप्रेमी व सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने शासन व प्रशासनाचा जाहीर निषेध करण्यात येत असल्याचे डॉ. ढवळे यांनी स्पष्ट केले.

# महात्मा फुले विद्यालय, मोठेवाडी येथे फुलवली सेंद्रिय परसबाग

**माजलगाव । प्रतिनिधी**



तालुक्यातील महात्मा फुले विद्यालय, मोठेवाडी येथे शिक्षक व विद्यार्थ्यांच्या संयुक्त प्रयत्नातून शाळेच्या आवारात सेंद्रिय परसबाग फुलवण्यात आली आहे. या परसबागेत सर्व प्रकारच्या पालेभाज्या पूर्णतः सेंद्रिय खतांचा वापर करून यशस्वीपणे पिकवण्यात आल्या आहेत.

शाळेला दररोज लागणाऱ्या पालेभाज्या बाजारातून आणल्या जातात, मात्र त्या रासायनिक फवारणी व खतयुक्त असतात. हे लक्षात घेऊन शाळेच्या वतीने आपण आपल्या शाळेतच सेंद्रिय शेती करावी असा संकल्प करण्यात आला. त्यानुसार शाळेचे मुख्याध्यापक श्री आर एम मुंडे सर सह शिक्षक श्री यु के राठोड सर श्री एस डि गणोरकर सर श्री जी आर शेळके सर श्री के आर दांडगे सर लिपिक श्री ए आर सोळंके सर सेवक श्री बी जी तिडके , श्री एन एम कांबळे यांच्या सह सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी मेहनत घेऊन सेंद्रिय पद्धतीने भाजीपाला उत्पादन केले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना सेंद्रिय शेतीचे प्रत्यक्ष ज्ञान मिळाले असून आरोग्यदायी आहाराबाबतही जनजागृती झाली आहे. शाळेच्या या अभिनव उपक्रमाबद्दल सर्व गावकऱ्यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन केले आहे.

# स्टेजवर याल, तरच पुढे जाल ! : विजय महागोविंद

## सिंदफणा पब्लिक स्कूल, माजलगाव येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**माजलगाव । प्रतिनिधी**



स्टेजवर याल, तरच पुढे जाल. संधी मिळाली की पुढे या, भीतीवर मात करा आणि स्वतः वर विश्वास ठेवा, असे ठाम मत शाळेचे माजी विद्यार्थी व सध्या माजलगाव येथे चार्टर्ड अकाउंटंट म्हणून कार्यरत असलेले श्री. विजय भाऊसाहेब महागोविंद यांनी व्यक्त केले. ते सिंदफणा पब्लिक स्कूल, माजलगाव येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. सविस्तर वृत्त असे की, शाळेच्या परंपरेनुसार दरवर्षी माजी विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात येते. या वर्षी या कार्यक्रमासाठी सी.ए. विजय महागोविंद व डॉ. दिव्या जाधव यांना आमंत्रित करण्यात आले होते. दोघांनीही आपल्या यशस्वी प्रवासाचे अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडत त्यांना ध्येय निश्चित करून कठोर परिश्रम करण्याचा सल्ला दिला. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होणे अत्यंत आवश्यक असल्याचे नमूद करत विजय महागोविंद यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकडे असलेल्या क्षमतेवर विश्वास व्यक्त केला. योग्य मार्गदर्शन आणि संधी मिळाल्यास ग्रामीण विद्यार्थीही कोणत्याही क्षेत्रात उज्ज्वल यश मिळवू शकतात, असे ते म्हणाले. डॉ. दिव्या जाधव यांनी शिक्षणाबरोबरच चारित्र्य, शिस्त आणि समाजाप्रती कर्तव्यभावना यांचे महत्त्व अधोरेखित केले. यश हे केवळ वैयक्तिक प्रगती पुरते मर्यादित न ठेवता समाजाच्या हितासाठी वापरले पाहिजे, असा संदेश त्यांनी दिला. शाळेचे प्राचार्य अन्वर शेख यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या समुपदेशक नीला देशमुख होत्या. त्यांनी आपल्या मनोगतातून शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण परंपरेचा उल्लेख करत माजी विद्यार्थ्यांच्या यशाचा अभिमान व्यक्त केला. उपप्राचार्य सुवर्णा शिंगणे, सौदागर साखरे तसेच शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, राज्यघटनेवर आधारित संविधान जागर नाटिका व भाषणांच्या माध्यमातून प्रजासत्ताक दिनाचा उत्साह साजरा केला. इयत्ता सहावी आणि सातवीच्या मुलींनी उत्कृष्ट लेझीम सादर केले तसेच स्काऊट गाईड आणि इतर विद्यार्थ्यांनी परेड सादर केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रमुख पाहुण्यांनी आणि उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक केले. प्रेरणा, आत्मविश्वास आणि राष्ट्रभक्तीचा त्रिवेणी संगम असलेला हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या मनात नवा उत्साह निर्माण करून गेला. या कार्यक्रमासाठी शैक्षणिक विभाग प्रमुख जीबी ऑगस्टीन, सुनीता सुरवसे, धनंजय सोमवंशी, अर्चना जाधव, शालिनी गडाख, देवेंद्र सोळंके आणि प्रदीप बुरकुल, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी घेतले.

# आदित्य अध्यापक महाविद्यालयाचे ‘ज्ञान अंकुर’ शिबिर उत्साहात

## कृतीयुक्त शिक्षणाचा आदर्श उपक्रम : बी.एड द्वितीय वर्ष छात्र अध्यापकांच्या आंतरवासिता शिबिरातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास

**बीड । प्रतिनिधी**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमानुसार आदित्य अध्यापक महाविद्यालय, बीड यांच्या वतीने बी.एड द्वितीय वर्षातील छात्र अध्यापकांसाठी ‘ज्ञान अंकुर’ आंतरवासिता (छात्रसेवा काल) शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरासाठी राष्ट्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बीड येथे विविध शैक्षणिक व कृतीयुक्त उपक्रम राबविण्यात आले. बी.एड अभ्यासक्रमाचा एक महत्त्वाचा भाग असलेल्या प्रात्यक्षिक कार्याच्या निमित्ताने हे शिबिर संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. पाच तास चाललेल्या या कार्यक्रमाला ३२० विद्यार्थी-विद्यार्थिनींची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे उद्घाटन राष्ट्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्य डी.ओ. तायडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रियदर्शनी प्राथमिक विद्यालयाचे ए.आय. पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. व्यासपीठावर प्राचार्य एम.बी. बावणे ,आर. ए. कारगुडे, प्रा.आय.आर. सय्यद ,बी. एस. जगताप ,एम. सी. चवार यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ए.आय. पाटील यांनी मनोगतात आदित्य अध्यापक महाविद्यालयाच्या छात्र अध्यापकांचे कौतुक करत विद्यार्थ्यांनी अशाच प्रकारे उपक्रमशील राहून शिस्त, गुणवत्ता व समाजाभिमुख दृष्टिकोन जोपासावा, असे मार्गदर्शन केले.

या शिबिरामागील उद्देश छात्र अध्यापकांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे तसेच प्रात्यक्षिक व कृतीयुक्त शिक्षण पद्धतीचा प्रभावी अनुभव देणे हा होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बी.एड द्वितीय वर्षाच्या छात्र अध्यापकांनी केले. महाविद्यालयाने असे उपक्रम राबवून आम्हाला एक वेगळे व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. सूत्रसंचालन बी.एड द्वितीय वर्षाचे छात्र अध्यापक शिवाजी साळुंखे यांनी केले, तर आभार आशिष वारे यांनी मानले. हा उपक्रम प्राचार्य मनीषा बावणे यांच्या उपस्थितीमध्ये यशस्वी पार पडला. आदित्य अध्यापक महाविद्यालयाचा गुणवत्तेचा ठसा-प्राचार्य एम.बी. बावणे: आदित्य अध्यापक महाविद्यालय, बीड हे केवळ शिक्षक घडवणारे महाविद्यालय नसून भावी शिक्षकांना कृतीयुक्त, अनुभवाधारित व समाजाभिमुख शिक्षणाची दिशा देणारी संस्था म्हणून ओळखले जाते. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमासोबतच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी विविध नावीन्यपूर्ण उपक्रम सातत्याने राबविले जातात. ‘ज्ञान अंकुर’ आंतरवासिता शिबिरासारख्या उपक्रमांमुळे छात्र अध्यापकांना प्रत्यक्ष शाळा स्तरावर काम करण्याची संधी मिळून त्यांचा आत्मविश्वास, नेतृत्वगुण व अध्यापन कौशल्य अधिक प्रगल्भ होत आहे.

# राजर्षी शाहू कन्या विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**





श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ संचलित राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक व राजमाता इंग्लिश स्कूल, तेलगाव रोड, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दि. २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रपिता महात्मा गांधी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस संस्थेचे अध्यक्ष इंजि. बलभीमराव जाहेर पाटील, उपाध्यक्ष डॉ. बी. आर. पंडित, सचिव प्रा. जे. पी. शेळके, कोषाध्यक्ष प्रा. ए. आर. पाटील, संचालक प्राचार्य ए. आर. डंबरे, विनोद डोंगरे, ऋषिकेश पाटील, सुनीता पाटील, शहाजी जोगदंड, वशिष्ठ खांडे, माजी मुख्याध्यापक चव्हाण बी. बी., हाजगुडे एस. आर., कुकडे बी. के., सेवानिवृत्त शिक्षक झोडगे जी. एस., राष्ट्रीय खेळाडू तुकाराम करांडे, मुख्याध्यापिका कदम एस. डी., मुख्याध्यापक राऊत आर. टी., प्राचार्या लोखंडे आर. डी. यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रतिमा अभिवादनानंतर श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळाचे कोषाध्यक्ष प्रा. ए. आर. पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. याप्रसंगी २६ जानेवारी निमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. राजमाता इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सैनिक, छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ तसेच पारंपरिक भारतीय संस्कृती दर्शविणाऱ्या विविध वेशभूषा परिधान करून कार्यक्रमात सहभाग घेतला. त्यांच्या आकर्षक, कल्पक व शिस्तबद्ध वेशभूषेमुळे कार्यक्रमाची शोभा अधिक वाढली. यावेळी राज्यगीत, संविधान वाचन, मानवंदना तसेच कला-संस्कृती दर्शन घडविणारे विविध कार्यक्रम सादर करण्यात आले. कार्यक्रमानंतर सर्व विद्यार्थिनींना खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन जगताप एस. सी. यांनी केले. कार्यक्रमास शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री नारायण विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**



बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथे २६ जानेवारी रोजी श्री नारायण मा. व उच्च मा. विद्यालयामध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला . प्रमुख पाहुणे ह. भ. प. हनुमान महाराज( श्री दत्त संस्थान शिंपेगाव) यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले तसेच संस्थेचे अध्यक्ष श्री महादेवराव काळे अण्णा, प्राचार्य तथा संस्थेचे सचिव अमोल काळे सर, माजी प्राचार्य विनायक ढास सर, श्रीमती राजश्री काळे मॅडम, महसूल अधिकारी श्री शिवाजी घोंगडे, श्री छबुलाल परदेशी, श्री शिवाजी चव्हाण, श्री राजेंद्र रुपनर, श्री प्रकाश इनकर यावेळी अनेक मान्यवर ,ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर बहारदार गीत आणि नृत्य सादर केले. शेख कय्युम यांच्या पुण्यस्मरणार्थ यावेळी दहावीतील आदर्श विद्यार्थी म्हणून ज्ञानेश्वर राजेंद्र रकटे तर मुली मधून रिद्धी रमेश रकटे या विद्यार्थ्यांना आदर्श विद्यार्थी म्हणून गौरवण्यात आले. यांना ट्रॉफी, दहावीचा अपेक्षित संच, १००० रुपये रोख रक्कम देण्यात आली.

विविध खेळात भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक चव्हाण सर यांनी केले तर सूत्रसंचालन करपे सर यांनी केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्राध्यापक अशोक घरत सर यांनी मानले. कार्यक्रमाला प्रा. मस्के जी.बी , श्री शेख सर,श्री इनकर बी .जे, प्रा. पौळ डी.बी, श्री चौधरी पी. बी, श्री रकटे एन. पी, श्री पवार सर, प्रा.मुरमुडे ए .एन , रकटे बी. आर , प्रा. रकटे पी. आर., श्रीमती भुतावळे मॅडम, श्रीमती मस्के मॅडम, श्रीमती जगताप मॅडम यावेळी शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# देवडी फाटा जि.प. शाळेत दिमाखात प्रजासत्ताक दिन साजरा



**वडवणी । प्रतिनिधी**

तालुक्यातील देवडी फाटा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात, शिस्तीत व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या पूर्वतयारीमध्ये शाळेच्या परिसरात आकर्षक पताके लावण्यात आले होते तसेच विद्यार्थ्यांनी सुंदर रांगोळी काढून शाळेला सणासुदीचा देखणा साज चढवला होता.सकाळी विद्यार्थ्यांची जोशपूर्ण प्रभातफेरी काढण्यात आली. वंदे मातरम् जय हिंद, भारत माता की जय अशा घोषणांनी संपूर्ण परिसर देशभक्तीने भारावून गेला. त्यानंतर शाळेच्या प्रांगणात मुख्याध्यापकांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. राष्ट्रगीतानंतर सर्वांनी *संविधानाप्रती निष्ठा राखण्याची व साक्षरतेची शपथ* घेतली.या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे शाळेला *प्रोजेक्टर भेट देणारे श्री. एकनाथ झाटे यांच्या मातेचा सन्मान व शाळेसाठी ३० लेझीम भेट देणाऱ्या मोरे मॅडम यांचा सन्मान करण्यात आला. या दोन्ही दात्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

# लोकमान्य टिळक माध्यमिक विद्यालय खापर पांगरी येथे भारतीय स्वातंत्र्याचा ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय शिक्षण प्रसारक मंडळ, बीड संचलित लोकमान्य टिळक माध्यमिक विद्यालय खापर पांगरी येथे भारतीय स्वातंत्र्याचा ७७ रावा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. राजेंद्रजी आगवान प्रमुख पाहूने प्रा. सतिश पत्की, सौ. स्मिता पत्की कार्यक्रमास उपस्थित सरपंच सौ.माने, उपसरपंच संदिप चव्हाण, दैनिक रिपोर्टर चे पत्रकार शेख मजित विक्रम अन्ना शेंडगे, नानाभाऊ शेंडगे, रोहीदास काटकर, राम माने, बाळासाहेब पऊळ इतर प्रतिष्ठित मंडळी ग्रामस्थ माजी विद्यार्थी बहुसंखेने उपस्थित होते या निमित्ताने विधार्थी प्रभात फेरी इलेमेंटरी इंटरमिजिएट परीक्षा तथा भूगोल प्रज्ञाशोध परीक्षा मेडल व प्रमाणपत्र वितरण करण्यात आले बाल विवाह मुक्त शपथ, संविधान वाचन, कवायत, कृतियुक्त गीत इत्यादी कार्यक्रम मुखाध्यापक श्री. घोडके डी .डी याच्या मार्गदर्शखाली पार पडला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री शेटे जी.व्ही यांनी केले तर सुत्र संचालन श्रीम. खडके ए.एल. व श्री. शेलार के.ए यांनी केले आभार श्री. उदगीरकर पी.एस यांनी मानले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहनत घेतली.



# विविध मान्यवरांकडून अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण...

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

दैनिक **मराठवाडा पत्र**

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • गुरूवार, दि. २९ जानेवारी २०२६ •



*बीड : भाजपचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर यांनी बारामती येथे जाऊन उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले. यावेळी नगरसेवक शुभम धूत, शुभम कातांगळे उपस्थित होते.*

# दादांच्या जाण्याने माझे पितृछत्र हरपले

## अजित पवारांच्या निधनाचे वृत्त समजताच धनंजय मुंडे ढसाढसा रडले

**बीड । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला आहे. अजित दादांच्या अकाली निधनामुळे सर्वांनाच धक्का बसला आहे. या धक्क्याने राष्ट्रवादी काँग्रेसमधील सर्वच नेते कोलमडून गेले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांना अजित पवारांच्या निधनामुळे अश्रू अनावर झाले आहेत. अजित पवारांच्या निधनानंतर राजकीय आणि वैयक्तिक आयुष्यातील सर्वात मोठा आधारस्तंभ हरपल्याच्या भावनेने धनंजय मुंडे यांना अश्रू अनावर झाले. वडिलांच्या निधनानंतर दादांनी मला कधीही वडील नाहीत, असं वाटू दिलं नाही, त्यांनी वडिलांची



उणीव भरून काढली होती, असे शब्दांत धनंजय मुंडेंनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली.

अजित पवार यांच्या अपघाताची बातमी समजताच धनंजय मुंडे तातडीने बीडहून बारामतीकडे रवाना झाले. प्रवासादरम्यान त्यांच्या एका निकटवर्तीय सहकाऱ्याने त्यांना फोन केला. यावेळी धनंजय मुंडेंना आपला हुंदका आवरता आला नाही. गदगदलेल्या आवाजात त्यांनी केवळ इतकेच म्हटले की, माझे वडील गेल्यानंतर दादांनी कधी वडील नाहीत याची जाणीव होऊ दिली नाही. यावेळी धनंजय मुंडेंचा भावनांचा बांध फुटल्यामुळे सॉरी, मी नंतर बोलतो असे म्हणत त्यांनी फोन ठेवला. त्यांच्या या

▶▶ उर्वरित पान २ वर

## अजितदादांच्या अकाली निधनाने बीड सह महाराष्ट्रावर शोककळा : शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते



महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या अकाली निधनाने संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली आहे. धडाडीचे नेतृत्व, स्पष्ट भूमिका आणि विकासाभिमुख दृष्टिकोन यामुळे त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात वेगळी ओळख निर्माण केली होती. बीड जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले व सामान्य जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य दिले. त्यांच्या जाण्याने राज्याने एक कर्तबगार, अनुभवी व लोकाभिमुख नेता गमावला आहे. ही पोकळी कधीही भरून न निघणारी आहे. भावपूर्ण श्रद्धांजली..

## वादा निभावणारे दादा

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे काल दु;निधन झाले. अजित दादा पवार अतिशय संयमी व्यक्तीमत्व होते.महाराष्टाच्या सर्वाधिक काळ उपमुख्यमंत्री म्हणून राहण्याचा मान त्यांना मिळतो. अजित दादांनी पाटबंधारे ,अर्थ व नियोजन यासह आदी खाती समर्थपणे सांभाळली.त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले ;तरी ते गडबडले नाहीत. अजित दादा उत्तम प्रशासक होते.तब्बल साडेतीन दशके त्यांनी महाराष्ट्राचे प्रशासन सांभाळले.अजितदादा उत्तम संघटक होते.शरदचंद्र पवारांच्या नेतृत्वात त्यांनी महाराष्ट्रात युवकांची फळी निर्माण केली. खासदार ,मंत्री, उपमुख्यमंत्री इ.पदे भुषवली.शेतकरी, ऊसतोड कामगार इ त्यांनी आपले मानले.बीड जिल्हयाला त्यांनी कधी परके मानले नाही.मृत्यूसमयी ते बीड जिल्हयाचे पालकमंत्री होते.- नामदेव लोंढे

## दादांच्या अकस्मिक निधनाने आम्ही पोरके झालो: अमरसिंह पंडित

**बीड । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार साहेब यांच्या अकाली निधनाने महाराष्ट्राच्या राजकारणाने एक उमदा व कणखर नेता गमावला आहे. त्यांच्या निधनाचे वृत्त मनाला सुन्न करणारे होते. मागील अनेक वर्षांपासूनचा त्यांचा प्रदिर्घ सहवास



माझ्यासारख्या कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी होता., उत्तम प्रशासक, अभ्यासु नेता, रोखठोक आणि स्पष्टोक्तेपणा हे त्यांच्या स्वभावाचे गुण संपुर्ण महाराष्ट्राला भावले होते. त्यांच्या स्वभावात कठोरता असली तरी त्यांनी आपुलकी आणि आपलेपणा जोपासला. त्यांच्या सहवासातील अनेक आठवणींना आज उजाळा मिळत आहे. शेतकरी आणि सर्वसामान्यांप्रती त्यांची तळमळ आणि संवेदनशिलता मी जवळून अनुभवली आहे. प्रशासनावर अचूक पकड असल्यामुळे व्यापक लोकहितासाठी नियमात न बसणारे अनेक कामे त्यांनी नियमात बसवून करून दाखवली आहेत. सत्ताधाऱ्यांपेक्षा पांढरपेशी प्रशासन वरचड होण्याच्या परिस्थितीत

▶▶ उर्वरित पान २ वर

## महाराष्ट्राने कणखर लेक गमावला: राजेंद्र आमटे

## जिल्ह्याच्या आशेचा किरण मावळला

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या जडणघडणीतील कणखर नेतृत्व कै.अजित दादा पवार यांच्या मुबई ते बारामती प्रवासात बारामती येथे विमान



किरणही आज मावळला आहे अजितदादा म्हणजे विकास, अजितदादा म्हणजे कणखरता; अजितदादा

दुर्घटना मध्ये दुःखात निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला आहे.

दादाच्या अचानक जाण्याने महाराष्ट्राने कणखर लेक गमावला आहे,अजित दादा यांच्या अचानक जाण्यामुळे संपूर्ण राज्यांमध्ये दुःखाच्या डोंगर कोसळला आहे सर्वसामान्यांच्या प्रश्नाला तडीस नेणारा एक कणखर पुत्र या महाराष्ट्रभूमीने गमावला आहे तसेच अजित दादा मुळे बीडकरांना एक विकास करण्याकरिता आशेचा किरण दिसत होता तो आशेचा म्हणजे कामाचे पावती ही जी ओळख होती ती संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अजित दादांनी निर्माण केलेली होती अजित दादा यांच्या अचानक जाण्यामुळे सर्वांना धक्का बसलेला आहे आणि बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना बीड जिल्ह्याचा विकास अजितदादाच करू शकतात हा एक आशेचा किरण माननीय अजितदादा बीडचे पालकमंत्री झाल्यापासून सर्वांना वाटत होता की

▶▶ उर्वरित पान २ वर

## अजित पवारांच्या जाण्याने महाराष्ट्रासोबत बीड झाला पोरका : अ‍ॅड शेख शफीक (भाऊ)

**बीड । प्रतिनिधी**

आजची सकाळ अकल्पनीय होती. पहाटे उठुन कामाला लागणारे महाराष्ट्राचे लाडके नेतृत्व तब्बल ७ वेळा उपमुख्यमंत्री राहिलेले अजित पवार यांचा अपघाती मृत्यू होणे हे मनाला पटत नाही. विश्वास बसत



नाही अतिशय कठोर मनाने हे सत्य स्विकारायला अंतकरण जड होत आहे. अजित पवारांसारखा मोठा नेत्याचा असा अंत होणे मनाला प्रचंड वेदना देत आहे. यानिमित्ताने पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या

▶▶ उर्वरित पान २ वर

## अतिशय दुःखद, धक्कादायक...



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना.अजितदादा पवार यांची विमान अपघातात निधन झाल्याची बातमी अत्यंत दुःखद व धक्कादायक आहे. आदरणीय दादांसोबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात काम करत असताना खूप काही शिकायला मिळाले. अत्यंत शिस्तप्रिय, परखड वक्ता, गतीशील निर्णय व सकाळी ६ वाजल्यापासून जनतेसाठी काम करणारा अशी उभ्या महाराष्ट्राला दादांची ओळख होती. असा नेता महाराष्ट्राला पुन्हा लाभणे नाही. अत्यंत जड अंतःकरणाने आदरणीय दादांना श्रद्धांजली अर्पण करतो. -डॉ. योगेश क्षीरसागर, भाजपा नेते, बीड.

## बीड जिल्ह्याचा 'पालक' हरपला



**अजित पवार यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून काम करताना केवळ पदाचा वापर केला नाही, तर जिल्ह्याच्या प्रत्येक प्रश्नात मनापासून लक्ष घातले. दुष्काळ असो वा विकासकामांचा निधी, अजित पवारांनी बीड जिल्ह्यासाठी नेहमीच झुकते माप दिले. जिल्ह्याच्या राजकारणात त्यांनी अनेक नेते घडवले आणि कार्यकर्त्यांना ताकद दिली. जिल्ह्याच्या विकासाची दृष्टी असलेला आणि प्रशासनावर वचक असलेला एक लोकनेता आज काळाच्या पडद्याआड गेल्याने बीड जिल्ह्याचे कधीही न भरून निघणारे नुकसान झाले आहे. दादा आपल्यात नाहीत, या सत्याचा स्वीकार करणे सध्या सर्वांसाठीच कठीण झाले आहे अशा भावना आ. मुंदडा यांनी व्यक्त केल्या.**

## 'अश्रूंनी ओलावलेली शांतता'...

### दादा, तुमची अनुपस्थिती प्रत्येक टप्प्यावर जाणवेल ; आ. नमिता मुंदडा यांची अजित पवार यांना साश्रूनयनांनी श्रद्धांजली

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धगधगते पर्व आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाचे वृत्त समजताच अवघ्या बीड जिल्ह्यासह मुंदडा कुटुंबावर शोककळा पसरली आहे. राजकीय भूमिकांच्या पलीकडे जाऊन जपलेले कौटुंबिक नाते आज काळाने कायमचे हिरावून नेले आहे. अजित पवार आणि मुंदडा कुटुंबाचे संबंध हे केवळ राजकीय नव्हते, तर ते भावनिक आणि कौटुंबिक होते. अजित पवारांच्या निधनाची बातमी वाऱ्यासारखी पसरली आणि केज मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांना आपले अश्रू अनावर झाले. आपल्या मार्गदर्शकाला आणि पितृतुल्य व्यक्तिमत्वाला गमावल्याच्या भावनेने नमिता मुंदडा यांनी साश्रूनयनांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

अजित पवार आणि दिवंगत नेत्या माजी मंत्री विमलताई मुंदडा यांच्यातील नाते महाराष्ट्राने अनेक वर्षे जवळून पाहिले आहे. विमलताईंना अजित पवारांनी नेहमीच आपली बहीण मानले होते. राजकीय

▶▶ उर्वरित पान २ वर

## राज्यातील तरुणांचा आत्मा हरवला : अ‍ॅड. सुभाष राऊत

### समता परिषदेच्यावतीने स्व. अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण

**माजलगाव । प्रतिनिधी**

राज्याचे एक उमदे नेतृत्व, कुशल प्रशासक, शिस्तप्रिय नेता म्हणून ज्यांची ओळख होती असे राज्याचे उपमुख्यमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांचे निधन झाल्याची बातमी अत्यंत दुःखदायक असून राज्यातील तरुणांचा आत्मा



हरवल्याची प्रतिक्रिया समता परिषदेचे राज्य सरचिटणीस तथा बीड जिल्हाध्यक्ष ड. सुभाष राऊत यांनी व्यक्त केली आहे.

१९९० साली जेव्हा काँग्रेस सरकार स्थापन झाले तेव्हापासून अजितदादा हे राज्यमंत्री म्हणून काम करत होते. पुढे सातत्याने ते मंत्रिमंडळात मंत्री म्हणून काम करत असताना

▶▶ उर्वरित पान २ वर

## देशातील तरुण फळीतील नेता गमावला : माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

राज्याचे एक उमदे नेतृत्व कुशल प्रशासक शिस्तप्रिय नेता म्हणून ज्यांची ओळख होती असे राज्याचे उपमुख्यमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांचे निधन झाल्याची बातमी अत्यंत दुःखदायक असून देशातील तरुण पिढी फळीतील एक उत्तम



नेता गमावला असल्याची भावना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी आपल्या शोक संदेशात व्यक्त केली आहे. १९९० साली जेव्हा काँग्रेस सरकार स्थापन झाले तेव्हापासून अजितदादा हे राज्यमंत्री म्हणून सोबत काम करत होते. पुढे सातत्याने ते मंत्रिमंडळात मंत्री म्हणून काम करत असताना त्यांच्या कामाची पद्धत आम्ही जवळून अनुभवली आहे, कुशल प्रशासक शिस्तप्रिय नेता म्हणून त्यांची राज्यात ओळख होती. राज्याचे एक उमदे नेतृत्व आपल्यापासून कायम दुरावले आहे पक्षाबरोबरच राज्याचेही मोठे नुकसान झाले आहे. देशातील तरुण फळीतील

▶▶ उर्वरित पान २ वर









# पगार नव्हे, आत्मसन्मान वाढवणारा नेता : प्रशांत जोशी

अजित दादांच्या निधनाने महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धगधगतं पर्व संपलं आहे. प्रशासनावर मजबूत पकड असलेला, कडक शिस्तीचा हा नेता आतून किती हळवा आणि माणुसकी जपणारा होता, याचा प्रत्यय आम्हाला २०१२ साली आला. त्यावेळी आम्ही आमदारांचे स्वीय सहाय्यक (PA) म्हणून नुकतेच रुजू झालो होतो. केवळ ७,८२५ रुपये इतक्या तुटपुंज्या मानधनावर घर चालवणं अवघड होतं. पगारवाढीचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. ही फाईल जेव्हा अजित दादांकडे आली, तेव्हा त्यांनी जे केलं, ते केवळ दादाच करू शकतात!

विधिमंडळाच्या लॉबीमध्ये सचिवांनी अवघ्या २ ते २.५ हजार रुपयांच्या वाढीचा प्रस्ताव मांडला होता. तो प्रस्ताव ऐकताच दादा त्यांच्या खास शैलीत कडाडले -अरे, १० हजारात काय होतं?



ही पोरं कुठे जाणार? थेट १५ हजारांचा प्रस्ताव द्या!

एका क्षणात आमचा पगार दुप्पट झाला. पण त्याहून मोठी गोष्ट म्हणजे, त्या निर्णयाने आम्हाला जगण्याचा आत्मविश्वास आणि कामाचा आत्मसन्मान मिळाला. दादांचं दातृत्व इथेच थांबलं नाही.

फडणवीस सरकारच्या काळात सुधीर भाऊ मुनगंटीवार यांनी वेतन २५ हजार रुपये केलं.

महाविकास आघाडी सरकारमध्ये दादांनी पुन्हा पुढाकार घेत हे वेतन ३० हजार रुपये केलं.

आणि विशेष म्हणजे, मागील वर्षी अर्थसंकल्पात हे वेतन ४० हजार रुपये करण्याचा त्यांचा ठाम मानस होता. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्या होत्या. यावर्षी ते नक्कीच प्रत्यक्षात उतरलं असतं कारण ते शब्दांचे पक्के दादा होते.

पण नियतीला काही वेगळंच

▶▶ उर्वरित पान २ वर


